# आरोग्य विभाग जिल्हा परिषद परभणी

## निविदा सुचना क्रमांक :- 03 (प्रथम वेळ)

**जिल्हा वार्षिक योजना सन 2023-24 मधील लेखाशिर्ष 2210-1755 प्राथमिक आरोग्य केंद्राचे/उपकेंद्राचे/आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांचे बळकटीकरण (सोयी सुविधामध्ये वाढ करणे) योजनेतंर्गत अखर्चित अनुदानातुन आयुर्वेदिक दवाखान्यासाठी साहित्य ,साधन सामुग्री व यंत्रसामुग्री खरेदी करणे**

**सन 2024-25 मधील अटी व शर्ती निविदा नमुना**

## E-Tender पोर्टलद्वारे ई- निविदा {निविदा नमुना}

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद परभणी व अंतर्गत संस्थाकरीता जिल्हा नियोजन समितीच्या अनुदानातुन प्राथमिक आरोग्य केंद्राचे/उपकेंद्राचे/आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांचे बळकटीकरण (सोयी सुविधांमध्ये वाढ करणे) योजनेतंर्गत प्राप्त अनुदानातुन साहित्य, साधन सामुग्री व यंत्र सामुग्री खरेदी करण्याकरीता याद्वारे खालील नियम,अटी व शर्तीची पुर्तता करु शकणारे नामांकित ISO-CE उत्पादक व नोंदणीकृत साहित्य पुरवठयाचा अनुभव असलेल्या अधिकृत पुरवठाधारका कडुन Annexure –B मधील नमुद साहित्य खरेदी करण्यासाठी ऑन लाईन पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. को-या निविदांचा नमुना ऑनलाईन पध्दतीने (https://mahatenders.gov.in) या संकतेस्थळावर उपलब्ध आहे.

| अ. क्र. | तपशील / लेखाशिर्ष | प्रस्तावित खरेदीची रक्कम | बयाना रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | को-या ई-निविदा फॉर्मची किंमत | ई-निविदा फॉर्मच्या किंमतीच्या 18 % G.S.T. |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | प्राथमिक आरोग्य केंद्राचे/ उपकेंद्राचे/ आयुर्वेदिक व युनानी दवाखान्यांचे बळकटीकरण (सोयी सुविधामध्ये वाढ करणे) योजनेतंर्गत साहित्य खरेदी लेखाशिर्ष 2210-1 755-31 | 40,00,000/- | 95,000/- | पुरवठा आदेशा च्या 3% | 5,000/- | 9,00/- |

ई-निविदा फॉर्म शुल्क रु.5,000/- + जी.एस.टी. रक्कम रु. 9,00/- असे एकुण रक्कम रु. 5,900/- ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावी. सदर रक्कम रु. 5,900/- नापरतावा असेल. तसेच ई.एम.डी. शुल्क रु.95,000/- ऑनलाईन पध्दतीने भरण्यात यावी.

सदर ई- निविदेची जाहिरात http://zpparbhani.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ई- निविदा भरतेवेळी वेबसाईट संबंधी कोणत्याही प्रकारच्या तांत्रीक अडचणी निर्माण झाल्यास (इंटरनेट कनेक्टीव्हीटी, ऑनलाईन पेमेंट ,तांत्रीक कागदपत्रे अपलोड करण्यात येणा-या अडचणी ) त्यास सदर कार्यालय जबाबदार असणार नाही व तांत्रिक अडचणी बाबतच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी. तांत्रीक अडचण आल्यास (https://mahatenders. gov. in) या वेबसाईट वर दिलेल्या हेल्प डेक्स कडुन तांत्रीक मदत घेण्यात यावी. निविदा साठी निश्चीत करुन दिलेल्या कालावधीतच निविदा भरण्यात यावी .सांधिक सभासद ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीनंतर प्राप्त होणा-या निविदांचा कोणताही विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ई-निविदा प्रसिध्दीची माहिती**

| अ.क्र. | | |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा प्रसिध्द दिनांक:- | दिनांक :- 10/02/2025 |
| 2 | ई-निविदा भरण्याचा कालावधी ( पासुन ते पर्यंत ) | दिनांक :- 10/02/2025 ते दिनांक :- 24/02/2025 |
| 3 | ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक :- 25/02/ 2025 |

प्राप्त ई-निविदा वरील अ.क्र. 03 मधील वेळेप्रमाणे (https://mahatenders.gov.in) वेबसाईट वरुन उघडण्यात येतील.निविदाधारक अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधीस निविदा उघडते वेळी हजर राहता येईल. निविदाधारक हजर नसले तरीही ई-निविदा ठरलेल्या दिवशी व त्याच वेळी उघडण्यात येतील.

| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी |
|---|---|---|

# Annexure –B

Following are the minimum requirements. Products offered must meet these parameters here in.

**Note :-** Before filling this document **Kindly carefully read term & conditions.**

| अ.क्र. | साहित्याचे नांव व स्पेसिफिकेशन | दर प्रति नग | दर मुख्यालय औषधी भांडार पर्यंत पोहोच सर्व करा सह |
|---|---|---|---|
| 1 | Panchkarma Model | दर प्रति 1 नग | |
| 2 | Tabels 4x1.5x3 | दर प्रति 1 नग | |
| 3 | Chairs | दर प्रति 1 नग | |
| 4 | LED Projecter | दर प्रति 1 नग | |
| 5 | Rolling Chair | दर प्रति 1 नग | |
| 6 | Massage Table | दर प्रति 1 नग | |
| 7 | Agnikarma Shalaka | दर प्रति 1 नग | |
| 8 | Kaping Set | दर प्रति 1 नग | |
| 9 | Library Book Shelf | दर प्रति 1 नग | |
| 10 | Shirodhara Yantra with stand ( Head Rest & Oil Collecting System | दर प्रति 1 नग | |
| 11 | Vaman Peet | दर प्रति 1 नग | |
| 12 | Kati Basti, Janu Basti, Hrid Basti Yantra Prishtavamsha Basti Yantra | दर प्रति 1 नग | |
| 13 | Nasya Chair | दर प्रति 1 नग | |
| 14 | Shirodhara Cap | दर प्रति 1 नग | |
| 15 | Dhum Pan Yantra | दर प्रति 1 नग | |
| 16 | Gokrn Yantra | दर प्रति 1 नग | |
| 17 | Basti Syringes | दर प्रति 1 नग | |
| 18 | Khal Stone | दर प्रति 1 नग | |
| 19 | Steam Bath | दर प्रति 1 नग | |
| 20 | Massage Quipment | दर प्रति 1 नग | |
| 21 | Thrometer | दर प्रति 1 नग | |
| 22 | Torch | दर प्रति 1 नग | |
| 23 | Stethoscope | दर प्रति 1 नग | |
| 24 | Measuring Tape | दर प्रति 1 नग | |
| 25 | Computer Table | दर प्रति 1 नग | |
| 26 | Instument Tray | दर प्रति 1 नग | |
| 27 | BP Apparatus | दर प्रति 1 नग | |
| 28 | Tongue Deppresser | दर प्रति 1 नग | |
| 29 | Knee Hammer | दर प्रति 1 नग | |
| 30 | Steel Cupboard | दर प्रति 1 नग | |
| 31 | Electric Weighing Machin | दर प्रति 1 नग | |

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | Trolly | दर प्रति 1 नग | |
| 33 | Nebulizer | दर प्रति 1 नग | |
| 34 | Glucometer | दर प्रति 1 नग | |
| 35 | Glucometer Strips | दर प्रति 1 नग | |
| 36 | Measuring Jar Set of different size | दर प्रति 1 नग | |
| 37 | Small Weighing Machin (Digital) | दर प्रति 1 नग | |
| 38 | Peti Sweda | दर प्रति 1 नग | |
| 39 | Disposable plastic sheet bundle | दर प्रति 1 नग | |
| 40 | Metal Syringes | दर प्रति 1 नग | |
| 41 | Steel Table Pantry | दर प्रति 1 नग | |
| 42 | Gas Stove with Burner | दर प्रति 1 नग | |
| 43 | Rubber Catheter | दर प्रति 1 नग | |
| 44 | Needle Disposal Machin | दर प्रति 1 नग | |
| 45 | Needles | दर प्रति 1 नग | |
| 46 | Leather Appron | दर प्रति 1 नग | |
| 47 | Gokarna | दर प्रति 1 नग | |
| 48 | Dropper | दर प्रति 1 नग | |
| 49 | Automatic Shirdhara machine | दर प्रति 1 नग | |
| 50 | Electric Swedan Cooker | दर प्रति 1 नग | |
| 51 | Medicines Trolley | दर प्रति 1 नग | |
| 52 | Steel Tray | दर प्रति 1 नग | |
| 53 | Cloth hanging Stand/Hook | दर प्रति 1 नग | |
| 54 | Foot Stepper | दर प्रति 1 नग | |
| 55 | Shoes Rack | दर प्रति 1 नग | |
| 56 | Exhaust Fans | दर प्रति 1 नग | |
| 57 | Induction base Utensil Kadhai | दर प्रति 1 नग | |
| 58 | Steel Seive | दर प्रति 1 नग | |
| 59 | Steel Pakkad | दर प्रति 1 नग | |
| 60 | Steel Glass | दर प्रति 1 नग | |
| 61 | Steel Spoon | दर प्रति 1 नग | |
| 62 | Steel Spoon | दर प्रति 1 नग | |
| 63 | Scissor | दर प्रति 1 नग | |
| 64 | Steel Plate | दर प्रति 1 नग | |
| 65 | Steel Jug | दर प्रति 1 नग | |
| 66 | Steel Bucket | दर प्रति 1 नग | |
| 67 | Mortal &Pestal | दर प्रति 1 नग | |
| 68 | Kidney Tray | दर प्रति 1 नग | |
| 69 | Mixer | दर प्रति 1 नग | |
| 70 | Kindi with Handle | दर प्रति 1 नग | |

| | | | |
|---|---|---|---|
| 71 | Induction base Tawa | दर प्रति 1 नग | |
| 72 | Steel bowl | दर प्रति 1 नग | |
| 73 | Tong | दर प्रति 1 नग | |
| 74 | Spatula | दर प्रति 1 नग | |
| 75 | Transperent Measuring Bucket | दर प्रति 1 नग | |
| 76 | Paraffin Wax Bath with Wax | दर प्रति 1 नग | |
| 77 | All in One desktop | दर प्रति 1 नग | |
| 78 | Water Purifier with chilling | दर प्रति 1 नग | |
| 79 | Pt.Waiting chairs | दर प्रति 1 नग | |
| 80 | Doctor Chair | दर प्रति 1 नग | |
| 81 | Examination Table with Matress | दर प्रति 1 नग | |
| 82 | Bed with Matress | दर प्रति 1 नग | |
| 83 | Bed side Loker | दर प्रति 1 नग | |
| 84 | Saline Stand | दर प्रति 1 नग | |
| 85 | Inverter with Batters | दर प्रति 1 नग | |
| 86 | Smokeless Bio-Medical Waste Incinerator | दर प्रति 1 नग | |
| 87 | Printer With Scanner (All in One) | दर प्रति 1 नग | |
| 88 | Refrigerator | दर प्रति 1 नग | |
| 89 | ECG Machine | दर प्रति 1 नग | |
| 90 | Fogging Machine | दर प्रति 1 नग | |

**( अ ) — तांत्रिक लिफाफा क्रमांक - 01**

**ई- निविदेच्या तांत्रीक लिफाफा क्र.01 मध्ये सादर करावयाच्या बंधनकारक कागदपत्राची यादी**

1. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अंतर्गत दुकान निरीक्षक यांचे प्रमाणपत्र ज्यात धंद्याचे / व्यवसायाचे स्वरूप नोंदणी आहे असे वैध प्रमाणपत्र, उत्पादक असल्यास उत्पादक असल्याचे वैध प्रमाणपत्र.
2. मान्यता प्राप्त पुरवठाधारक असल्यास सहाय्यक आयुक्त अन्न व औषधी प्रशासन यांचेकडील नोंदणीचे वैध प्रमाणपत्र / औषधी विक्रीबाबत अनुज्ञप्ती परवाने (डिस्ट्रीब्यूटर असल्याचे) तसेच उत्पादक असल्याचे वैध प्रमाणपत्र.(नमुना 20 बी व नमुना 21 बी ई.)
3. अन्न व औषधी प्रशासनाचे पुरवठाधारकांना दिलेली नो कन्वेक्शन प्रमाणपत्र ( NO CONVECTION CERTIFICATE ) वैध असलेले सादर करणे आवश्यक राहील.
4. निविदा भरण्यासाठी पुरवठादार उत्पादक अथवा अधिकृत विक्रेता असणे बंधनकारक आहे. तसेच अधिकृत विक्रेत्यांना ई-निविदा भरावयाची असल्यास, ते ज्या उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेता आहेत, त्या कंपनीच्या लेटरहेड वर मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांचे नावे कंपनीच्या अधिकृत अधिका-याचे सदर अधिकृत विक्रेता त्या कंपनीचा अधिकृत विक्रेता असल्याचे व त्याच कंपनीचे साहित्य यांचा पुरवठा करणार असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
5. निविदा धारकांनी रु. 500/- च्या स्टॅम पेपरवर निविदेमधील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे शपथपत्र हे रजिस्टर नोटरी सहित सादर करणे बंधनकारक राहील.
6. औषधीचे दर M.R.P./ D.P.C.O./ N.P.P.A यांच्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबतचे रु.500/- स्टॅम पेपरवर प्रतिज्ञापत्र (ॲफिडिव्हेट ) हे रजिस्टर नोटरी सहित जोडणे आवश्यक राहील.

7.निविदा धारकांनी रु. 500/-च्या स्टॅम्प पेपर वर आम्ही WHO-ISO,CE प्रमाणित उत्पादक कंपनीची यादीवरील साहित्याचा पुरवठा करण्यास बांधिल असुन त्यानुसारच साहित्याचा पुरवठा करण्यात येईल बाबतचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

8. तसेच पुरवठाधारकांचे / निविदा धाराकांचे नाव शासनाच्या शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये काळया यादीत (Black List ) नसल्याचे रु. 500/- च्या मुद्रांकित शुल्कावर नोटरी करून (स्टॅम्प पेपर ) प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक राहील.

9. पुरवठा धारक / निविदा धारकांनी निविदेमध्ये ऑनलाईन सादर केलेली माहिती व कागदपत्रे हि खरी ,बरोबर व पुर्ण आहेत. तसेच सादर केलेली कागदपत्रे ही निविदा कालावधी दरम्यान किंवा निविदा कालावधी समाप्ती नंतर चुकीची दिशाभुल करणारी, खोटी व बनावट / फसवी तसेच अपुर्ण आढळल्यास त्याबाबत भारतीय दंड संहितानुसार कायदेशीर कार्यवाहीस पात्र असल्याबाबत चे रु. 500 च्या स्टॅम पेपरवर नोटरी करुन सत्यप्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

10. अन्न व औषधी प्रशासनाचे पुरवठाधारकांना दिलेली वैद्यकिय यंत्रसामुग्री व साधन सामुग्री विक्री करण्याचे वैध परवाना प्रमाणपत्र ( FORM MD 42 LICANCE CERTIFICATE ) वैध असलेले सादर करणे आवश्यक राहील.

11. सदरील साहित्य शासकीय कार्यालयात निविदा रक्कमे इतका (म्हणजेच 40.00/- लक्ष रक्कमेएवढे) पुरवठा केल्याचे अनुभव प्रमाणपत्र ( पुरवठा आदेशाच्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे.)

12. सन 2021-22, सन 2022- 23 व सन 2023-24 या तीन वर्षातील फर्मच्या उलाढालीचे (Balance Sheet) रजिस्टर चार्टर्ड अकाऊटंन्ट यांचे प्रमाणित प्रमाणपत्र (प्रति वर्ष रु. 40.00/- लक्ष टर्न ओव्हर असणे आवश्यक आहे.)

13. सन 2021-22, सन 2022- 23 व सन 2023-24 या तीन वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न भरलेले कागदपत्र (Income Tax Return Document)

14. सन 2021-22, सन 2022- 23 व सन 2023-24 या तीन वर्षाचे नफा व तोट्याचे (Profit & Loss Account Sheet) रजिस्टर चार्टर्ड अकाऊटंन्ट यांचे प्रमाणित प्रमाणपत्र.

15. पॅन कार्ड छायांकित प्रत स्वक्षांकित करुन सादर करणे बंधनकारक राहील.

16.जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र तसेच जी.एस.टी. कायद्या प्रमाणे अद्यावत जी.एस.टी. भरलेल्या पावत्या किंवा माहे डिसेंबर 2024 पर्यंत भरण्यात आलेल्या रिटर्न ची प्रत / निपटारा प्रमाणपत्र

17. ई- निविदा शुल्क ऑनलाईन भरल्याचे पोच / पावतीची प्रत,जर सुट असेल तर त्याबाबत आवश्यक कागदपत्रे

18. ई.एम.डी. शुल्क ऑनलाईन भरल्याचे पोच / पावतीची प्रत, जर सुट असेल तर त्याबाबत आवश्यक कागदपत्रे

19. सदरील साहित्य हे एकाच आरोग्य संस्थेत पुरवठा करुन कार्यान्वीत करुन दयावयाचे असल्याने सदर संस्थेतील औषध निर्माण अधिकारी यांचे समक्ष उपस्थितीत सदरील साधन सामुग्री कार्यान्वीत करण्याची जागा व इतर सर्व कामाची तपशिलवार स्थळ पाहणी करुन जीओ टॅग फोटो पुराव्या निशी सदर अहवाल जिल्हा परिषद आरोग्य विभाग परभणी येथील मुख्य औषध निर्माण अधिकारी यांचेकडुन प्रमाणित करुन घेऊन तो तांत्रिक लिफाफया मध्ये सादर करणे अनिवार्य आहे.

## ( ब ) — व्यापारी लिफाफा क्रमांक - 02

**ई- निविदेच्या व्यापारी लिफाफा क्र.2 मध्ये सादर करावयाच्या बंधनकारक कागदपत्राची यादी**

1. यामध्ये केवळ दर भरलेली निविदा ऑनलाईन पध्दतीने वर दर्शविलेल्या प्रमाणे BOQ मध्येच सादर करण्यात यावी.

* वरिल निविदा (https://mahatenders. gov. in) या संकतेस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली करण्यात आलेली आहे. निविदा धारकाने उपरोक्त निविदा डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC) वापरुन निविदा भरावी .

## निविदेच्या अटी व शर्तीचा तपशील

1. पुरवठाधारकांनी ई-निविदामध्ये सादर करावयाची बंधनकारक कागदपत्रे ऑनलाईन पध्दतीने ई-निविदेच्या लिफाफा क्र.1 (तांत्रीक लिफाफा क्र-1) मध्येच सादर करावी.
2. साहित्यांचे दर ऑनलाईन पध्दतीने ई- निविदेच्या आर्थीक लिफाफा क्र.2 (दराचा लिफाफा क्र.2) मधील BOQ मध्ये सादर करावेत. **BOQ मधील सर्वच साहित्याचे दर नमुद करणे आवश्यक आहे**. निविदाधारकांनी दराच्या लिफाफया मधील दिलेल्या पॅक साईज प्रमाणे भरावेत . साहित्याचे दर भरताना दर सर्व कर समाविष्ट करुन असावेत. (म्हणजे GST सह इतर वाहतूक भाडे,हमाली, आयकर इत्यादी सह डोअर डिलेव्हरीने पोहच करण्यासह असावेत. )
3. पुरवठा केलेल्या औषधी साहित्याचा मुदत बाह्य दिनांक हा कमीत कमी दोन वर्षापेक्षा जास्त असणे आवश्यक / आहे बॅच नंबर इत्यादी बाबी आणि ,मुदतबाह्य दिनांक,उत्पादन तारीख ,धोच्या वेष्टनावर औषधाचे नांवतसेच औष . "For Use Of Government Of Maharashtra Not For Sale " असे जांभळया किंवा हिरव्या रंगात ठळक अक्षरात मुद्रित केलेली असणे बंधनकारक राहील.
4. ई-निविदेमध्ये एका साहित्याचे दर मागविण्यात आलेले आहेत.परंतु वार्षीक मागणी प्रमाणे व अनुदानाच्या उपलब्धते प्रमाणे साहित्यांची खरेदी करण्यात येईल .दर मागविण्यात आलेल्या सर्वच साहित्याची खरेदी करणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. तसेच निविदेत देण्यात आलेल्या साहित्याची खरेदी कार्यालयाच्या आवश्यकते नुसार कमी / जादा करण्याचा अधिकार कार्यालयाने राखून ठेवलेला आहे. आवश्यकतेनुसार साहित्य संख्येत बदल करण्यात येईल.
5. निविदा धारकांनी विभागाने मागविलेल्या आवश्यक तेवढीच कागदपत्रे अपलोड करावीत. उपरोक्त् नमुद केलेल्या कागदपत्रा व्यतिरिक्त ईतर कागदपत्रांचा समावेश करु नये. **तसेच कागदपत्रे ज्या क्रमाने मागविलेली आहेत त्याच क्रमाने पीडीएफ ( PDF) करुन ऑनलाईन** तसेच **नंतर ऑफलाईन सादर करावीत**. निविदेमध्ये मागविण्यात आलेली सर्व कागदपत्रे स्वत: प्रमाणित (Self Attested) करुन व रबरी स्टॅम लावुन स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक राहील. जेणेकरुन तांत्रिक लिफाफ्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने सादर केलेले कागदपत्रे व्यवस्थित,स्पष्ट स्कॅन केलेले नसल्यास, अपुर्ण स्कॅन केलेले असल्यास,वाचनीय नसल्यास, त्याआधारे निविदा फेटाळली जाऊ नये व हार्ड कॉपी मधील कागदपत्रांच्या आधारे खात्री करता यावी.तथापि असे न केल्यास निविदा धारकास आक्षेप नोंदविण्याचा अधिकार राहणार नाही. याप्रमाणे कार्यवाही न करणाऱ्या निविदा धारकाच्या निविदा नाकरल्या जाऊ शकतात.
6. उपरोक्त प्रमाणे निविदा धारकाने निविदा भरल्यानंतर निविदेमध्ये मागविण्यात आलेली कागदपत्रे व तांत्रिक लिफाफया मधील नमुद सर्व कागदपत्रांची मुळ प्रत व हार्ड कॉपी जसे बॉन्ड, विविध प्रकारच्या परवान्याची प्रती तसेच निविदा फि व वयाणा रक्कमेची सुट घेतल्या बाबतची संबंधित कागदपत्रे इत्यादी. जिल्हा औषधी भांडार, जिल्हा परिषद, परभणी येथे निविदा कालावधीच्या शेवटच्या दिवशी कार्यालयीन वेळेत स्वत: उपस्थित राहुन सर्व कागदपत्रे समक्ष तपासून घ्यावयाची आहेत. सदरील मुळ कागदपत्रे ही पोस्ट टपालाने व कुरिअर सेवा ने व परस्पर रित्या स्वीकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. याबाबत निविदा धारकाची कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच जे निविदाधारक मुळ कागदपत्रे सादर करणार नाहीत त्यांची निविदा (तांत्रिक लिफाफा ) उघडण्यात येणार नाहीत.
7. ई- निविदेमध्ये साहित्य निहाय न्युनत्तम दर निश्चीत करण्यात येतील,जर एखादया साहित्याचे न्युनत्तम दर सारखे असतील तर वाटाघाटी नंतर ज्या पुरवठा धारकाचे दर न्युनत्तम येतील त्यांना पुरवठा आदेश देण्यात येईल.
8. न्युनत्तम औषधी / साहित्याचे एक वर्षा करीता दर निश्चीत करुन दर करार करण्यात येतील.मंजुर झालेल्या दराने पुरवठाधारकास **दर मंजुरी आदेशाच्या दिनांका पासुन एक वर्षा करीता साहित्याचा पुरवठा करणे**

**बंधनकारक** राहिल.तसेच गरजेनुसार ई –निविदेतील मंजुर दराची मुदत वाढविण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद, परभणी यांना राहतील .

9. महाराष्ट्र शासन उदयोग ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय दिनांक 01.12.2016 मधील प्रकरण 04 मुद्दा क्रमांक 4.6 (ड) नुसार सुक्ष्म व लघु उदयोग विकास अधिनियम -2006 अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उदयोगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासुन सुट देण्यात येत आहे. परंतु तसे वैध असलेले नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

10. शासनाच्या नियमानुसार निविदा मान्य झाल्यानंतर यशस्वी पुरवठाधारकास आठ दिवसाच्या आत मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 34 अन्वये अनुसुची एक मधील अनुच्छेद 63 नुसार स्टॅम पेपरवर निविदेतील अटी व शर्ती, तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्ती बिनशर्त मान्य असल्याबाबत करारनामा करुन द्यावा लागेल. त्यानंतरच दर अंतिमत: स्विकारले असे समजण्यात येईल व त्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात येईल.

11. साहित्याचा पुरवठा करताना WHO-ISO,CE उत्पादक कंपनिचा तसेच ज्या साहित्यास WHO-ISO,CE असे प्रमाणीत साहित्याचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

12.पुरवठा आदेशाच्या अनुषंगाने साहित्याचा पुरवठा केल्यानंतर सदर साहित्याचे त्याच्या विनिर्देशाप्रमाणे गुणवत्ता तपासणी ही शासन निर्णय दिनांक 01/12/2016 मधील परिशिष्ट 12 मध्ये नमुद शासन मान्यताप्राप्त संस्थेकडुन गुणवत्ता तपासणी करणे करुन त्याचा तपासणी अहवाल सादर करणे बंधनकारक असेल. तसेच सदरील विनिर्देशाप्रमाणे साहित्यगुणवत्ता तपासणी साठीचा येणारा खर्च हा संबंधित पुरवठाधारकास अदायी करावा लागेल.

13. पुरवठा केलेले साहित्य अप्रमाणित असल्याचे आढळून आल्यास सदर साहित्य तात्काळ बदलून द्यावे लागेल. तसेच औषधी माल पुरवठादारास स्वखर्चाने घेऊन जावा लागेल व तात्काळ आठ दिवसाच्या आत नवीन मालाचा पुरवठा करावा लागेल.

14. पुरवठा धारकास कसलाही प्रकारचे अग्रिम दिले जाणार नाही, ते देयकाची अदायगी ही निविदे तील अटी शर्तीनुसार साहित्याचा पुरवठा झाल्यानंतरच करण्यात येईल.

15. अनुदाना अभावी पुरवठाधारकांचे देयक प्रलंबित राहिल्यास पुरवठाधारकास मालाचा पुरवठा बंद करता येणार नाही.

16. पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्याचा पुरवठा 30 दिवसात करणे बंधनकारक राहील पुरवठा करण्यास विलंब झाल्यास रुपये 2.00 लक्ष पर्यंतचा पुरवठा आदेशासाठी 0.5% प्रति आठवडा व जास्तीत जास्त आदेशाच्या 10 टक्के तसेच रुपये 2.00 लक्ष पेक्षा जास्त पुरवठा आदेशाच्या 0.5 टक्के प्रति आठवडा व अधिक जास्तीत जास्त पुरवठा आदेशाच्या 05 टक्के रक्कम साहित्य उशिरा पुरवठा केल्यास दंड वसूल करण्यात येईल. सदरील दंडाची रक्कम त्यांच्या मुळ देयकातुन कपात करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. विहित कालावधीत साहित्य पुरवठा करण्यास अपरिहार्य कारणास्तव विलंब लागत असेल तर विभागास अवगत करणे बंधनकारक राहील.विलंबाचे कारण रास्त असेल तर दंडातुन सुट देण्याचे अधिकार जिल्हा आरोग्य अधिका-यांना राहील. तसेच या साहित्याचा पुरवठा विहित कालावधीत केलेला नाही तर पुरवठा आदेश रद्द करून पुरवठाधारकांचे नाव शासनाच्या काळया यादीत टाकण्याची शिफारस करण्यात येईल.

17.दर मान्य केलेल्या पुरवठा धारकांनी साहित्याचा पुरवठा करताना ई-निविदेतील अटी शर्तीचे तंतोतंत पालन करून दिलेल्या विनिर्देशानुसार करावा लागेल, तसेच विनिर्देशात बदल आढळून आल्यास सदर साहित्य स्वीकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच साहित्या बाबत काही शंका आल्यास सदर साहित्याची प्रमाणित प्रयोगशाळा यांच्या कडून तपासणी करण्यात येईल तपासणीचा खर्च पुरवठाधारकास करावा लागेल.

18. **पुरवठा करण्यात येणा-या साहित्याचा दर्जा हा उच्च प्रतीचा असावा, साहित्याचा वापराने रुग्णास काही बाधा झाल्यास पुरवठाधारकांना त्यासाठी जबाबदार धरण्यात येऊन कायदेशिर कार्यवाही करण्यात** येईल.साहित्याचे पुरवठयासोबत आवश्यक विनिर्देशाप्रमाणे गुणवत्ता तपासुन अहवाल कार्यालयास सादर करावा लागेल.त्यानंतरच साहित्य हे विनिर्देशाप्रमाणे असल्याची खात्री करुनच देयक अदायी करण्यात येईल.

19. साहित्याचा पुरवठा, आयुर्वेदिक दवाखाना मौजे थडीउक्कडगांव ता.सोनपेठ येथे करणे बंधनकारक राहील.

20. दर मंजुर पुरवठाधारकांना ज्या ज्या वेळी पुरवठा आदेश देण्यात येतील त्यावेळी पुरवठाधारकांनी 08 दिवसात सुरक्षा ठेव म्हणून

पुरवठा आदेशाच्या 03 टक्के रकमेची धनाकर्ष देणे आवश्यक असेल. सदर धनाकर्षाची रक्कम पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासुन पुरवठा केलेल्या साहित्याच्या बाबतीत काहीही तक्रार नसल्यास निविदेमधील अटी व शर्तीची पुर्तता केल्याची खात्री झाल्यानंतरच सदरील अनामत रक्कम एक वर्षानंतर मुक्त केली जाईल.तसेच सुरक्षा ठेव रक्कमेवर व बयाणा रक्कमेवर या कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.**तसेच धनाकर्ष हा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी Payable At Parbhani यांचे नावाने देय असलेला असावा.**

21. निविदा विना अट असावी. अपूर्ण असलेली निविदा तसेच अटी सह आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत व त्या अपात्र ठरविल्या जातील.
22. निविदा प्रपत्रातील व निविदा नोटीस मधील सर्व अटी शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदा पैकी कोणतेही निविदा अथवा सर्व निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा निविदेच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा फेटाळण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांनी राखून ठेवलेला असून निविदा भरलेल्या व्यक्तीला ,संस्थेला निविदा फेटाळल्या बाबत स्पष्टीकरण मागता येणार नाही.
23. ई- निविदेच्या नमूद अटी शर्तीमध्ये अंतर्भाव करणे किंवा वगळण्याचा अथवा निविदा कोणतेही कारण न दर्शविता स्विकारणे किंवा नाकारणेचा (कोणत्याही वेळी) पूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, परभणी यांनी राखून ठेवला आहे.नामंजूर निविदेबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी,सांघिक सभासद ग्राहय धरला जाणार नाही ग्राहयता दर्शवावी.
24. दर भरताना पुरवठाधारकांनी सर्व नियम अटी व शर्तीचा व दिलेल्या पॅक साईजचा विचार करूनच दर भरावेत.निविदेमध्ये दर नजरचुकीने भरले गेलेले आहेत अशा विनंतीचा किंवा पत्र व्यवहाराचा विचार केला जाणार नाही.निश्चित झालेल्या न्युनत्तम दराने पुरवठा करणे बंधनकारक असेल याची नोंद घ्यावी.
25. ई-निविदे मध्ये मान्य दराचे दरकरारास या कार्यालयाच्या पूर्व परवानगीशिवाय इतर कोणत्याही शासकीय / निमशासकीय तसेच खाजगी संस्थेत वापरता येणार नाही याची पुरवठाधारकाने नोंद घ्यावी.
26. सदर ई- निविदेस शासनाने सर्व खरेदी विषयी शासन निर्णय दिनांक 01.12. 2016 तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.
27. निविदेमधील वस्तुचे पुरवठा आदेश देण्यापुर्वी शासना मार्फत दर करार झाल्यास अथवा शासनाचे खरेदी धोरणात बदल झाल्यास सदर वस्तुची खरेदी ही शासन दर करारावर / शासनाच्या निर्णयानुसार करण्यात येईल. तसेच शासनाचे खरेदी धोरणात बदल होऊन सर्व खरेदी ही राज्यस्तरावर करण्याचा निर्णय झाल्यास कार्यालयामार्फत कोणतीही खरेदी करण्यात येणार नाही.
28. ई-निविदा उघडतेवेळी प्रथम तांत्रिक लिफाफा क्रमांक 01 उघडण्यात येईल. तांत्रिक लिफाफया मधील सर्व कागदपत्रे परिपुर्ण असल्याची खात्री झाल्यानंतरच पात्र निविदाधारकांची दर भरलेली (व्यापारी लिफाफा) निविदा विचारात घेतील जाईल. तदनंतरच दर भरलेली (व्यापारी लिफाफा) ऑनलाईन निविदा उघडण्यात येतील.
29. सदर निविदा सुचनेतील औषधी साहित्याचे यादीमध्ये काहीही अंतर्भुत असले तरीही केंद्र शासन / महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या कोणत्याही प्रकारच्या औषधी साहित्याचा पुरवठा करण्यात येऊ नये.
30. पुरवठा धारक / निविदा धारकांनी निविदेमध्ये ऑनलाईन सादर केलेली माहिती व कागदपत्रे ही निविदा कालावधी दरम्यान किंवा निविदा कालावधी समाप्ती नंतर चुकीची दिशाभुल करणारी, खोटी व बनावट / फसवी तसेच अपुर्ण आढळल्यास त्याबावत पुरवठाधारक / निविदाधारक हे संपुर्णपणे जबाबदार राहतील. तसेच त्यांचे विरुध्द भारतीय दंड संहितानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याबबत प्रस्तुत कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी जबाबदार असणार नाहीत.
31. निविदेशी संबंधित काही वाद उदभवल्यास किंवा कायदेशीर अडचणी आल्यास त्यासाठी न्यायालयाचे ठिकाण परभणी मुख्यालय हे राहील.तसेच शासन निर्णय दिनांक 01/12/2016 मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
32. ई-निविदा बाबत किंवा अटी शर्तीचा भंग केल्यास किंवा साहित्याच्या पुरवठ्या संबंधात तसेच इतर काही कारणा बाबत वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ,परभणी यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल व न्यायिक घटनेसाठी परभणी जिल्हा हे कार्यक्षेत्र असेल.

| | | |
|---|---|---|
| जिल्हा आरोग्य अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी | मुख्य लेखा व वित्त अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी | मुख्य कार्यकारी अधिकारी<br>जिल्हा परिषद परभणी |